# बृहन्मुंबई महानगरपालिका - प्राथमिक शिक्षण विभाग

---

**"वंचित व दुर्बल घटकांसाठी राखीव 25 % जागा" ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया 2015 –16**

---

**"बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम,** 2009" **अंतर्गत पात्र खासगी प्राथमिक शाळांतील दुर्बल व वंचित घटकांतील पात्र बालके राखीव प्रवेशाच्या** 25 % **जागांपासून वंचित राहू नये म्हणून महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार शासनाने निर्माण केलेल्या ऑनलाईन पध्दतीने बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग शैक्षणिक वर्ष** 2015-16 **मध्ये ऑनलाईन प्रवेश प्र**क्रिया राबविण्यात येत आहे**,** यासाठी पालक **/** नागरिक आणि स्वयंसेवी संस्था यांचे सहकार्य अपेक्षित आहे**.**

**पालकांसाठी मार्गदर्शक सूचना:-**

(1) प्रवेशासाठी पात्र बालकांच्या पालकांनी आपल्या सोयीनुसार दि. 27.02.2015 पासून ते दि. 18.03.2015 अखेरपर्यंत ऑनलाईन प्रक्रियेद्वारे आवश्यक कागदपत्रांच्या प्रमाणित प्रतीसह अर्ज करावेत. त्यानंतर अर्ज करता येणार नाही.

(2) ऑनलाईन अर्ज शासनाच्या rte25admission.maharashtra.gov.in संकेतस्थळावरून करता येईल.

(3) आरक्षित प्रवेशाच्या जागा मर्यादित आहेत. संबंधित शाळेची प्रवेश क्षमता विचारात घेता अर्ज केलेल्या प्रत्येक बालकांस मिळेलच असे गृहित धरता येणार नाही.

(4) पालकांना या प्रवेश प्रक्रियेत कोणतीही अडचण येवू नये, म्हणून संपूर्ण बृहन्मुंबई क्षेत्रात 24 मार्गदर्शक केंद्रांची निर्मिती करण्यात आली आहे. या केंद्रांमध्ये पालकांना मार्गदर्शन केले जाईल. तथापि या केंद्रावर प्रत्यक्ष अर्ज भरता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

(5) पालकांना मोफ़त अर्ज भरण्याची सुविधा सोबत दिलेल्या केंद्रावर उपलब्ध असून त्याचा पालकांनी लाभ घ्यावा.

(6) या केंद्रांची सविस्तर माहिती उपरोक्त संकेतस्थळांवर आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या www.portal.mcgm.gov.in या संकेतस्थळावर **EDUCATION DEPARTMENT (शिक्षण खाते)** या विभागामध्ये **Docs** या प्रकारातील **Information of Private Primary schools** या सदराखाली उपलब्ध आहे.

(7) अर्ज करण्यापूर्वी पालकांनी संकेतस्थळावरील माहिती काळजीपूर्वक वाचावी.

(8) पालकांनी या केंद्रावरून किंवा अन्य ठिकाणाहून खासगीरित्या केलेल्या अर्जाची पडताळणी वरील केंद्रावर केली जाईल त्या केंद्रामधून त्याची प्रत (Print out) काढून घ्यावी.अर्ज योग्य असल्यास पालकांना अर्ज स्वीकारल्याबाबत किंवा नाकारल्याबाबत संदेश अर्जात नमूद केलेल्या मोबाईल क्रमांकावर पाठविला जाईल आणि तेच अर्ज प्रवेशाकरिता पात्र असतील.

(9) पालकांनी निवासापासून 1 किमी/3 किमी परिसरातील पात्र किमान ती्न शाळा निवडाव्यात. आपले निवास संकेतस्थळावर निश्चित करताना काळजीपूर्वक दाखवावे, जेणेकरून आपण निवडलेली शाळा पायी चालत जाण्यायोग्य 3 किमी अंतराच्या आत असेल.

(10) पालकांनी आपले निवास स्थान गुगल मॅप संकेतस्थळावर निश्चित करताना काळजीपूर्वक दाखवावे, जेणेकरून आपण निवडलेली शाळा पायी चालत जाण्यायोग्य 3 किमी अंतराच्या आत असेल. याकरिता संकेतस्थळावर देण्यात आलेल्या विविध ॲप्स चा वापर करावा.

(11) शाळेच्या प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त वैध अर्ज प्राप्त झाल्यास सोडत काढून प्रवेश निश्चित केले जातील व शाळेच्या प्रवेश क्षमतेपेक्षा कमी वैध अर्ज प्राप्त झाल्यास प्राप्त झालेल्या अर्जांपैकी सर्व पात्र अर्जदारांना प्रवेशासाठी विचार केला जाईल.

(12) सोडत झाल्यानंतर याबाबत प्रवेश निश्चित झालेल्या पालकांनी अर्जात नमूद केलेल्या माबाईल क्रमांकावर एस.एम.एस. व्दारे सूचित केले जाईल.

(13) ऑनलाईन सोडत पद्धतीने प्रवेश निश्चित झालेल्या शाळेत आपल्या पाल्याचा प्रवेश विहित मुदतीत घेणे बंधनकारक आहे.

(14) ऑनलाईन सोडत पद्धतीने प्रवेश निश्चित झालेल्या शाळेत आपल्या पाल्याचा प्रवेश न घेतल्यास ते बालक दुस-या फ़ेरीकरिता पात्र राहणार नाही.

(15) ऑनलाईन सोडत पध्दतीने प्रवेश निश्चित झालेल्या शाळेत आपल्या पाल्याचा प्रवेश घेताना प्रवेशासाठी आवश्यक असलेल्या प्रमाणपत्रांच्या मूळ व साक्षांकित प्रती, प्रवेश अर्जाची प्रत आणि प्रवेश निश्चित झाल्याची प्रत शाळेत सादर करणे बंधनकारक राहील.

(16) शासनाने निश्चित केलेली आवश्यक कागदपत्रे ग्राहय धरण्यात येतील. अन्य कोणतीही कागदपत्रे, (मा. लोकप्रतिनिधी, वरिष्ठ अधिकारी यांनी दिलेले शिफ़ारस पत्र.) किंवा कारणे विचारात घेतली जाणार नाहीत किंवा स्वीकारली जाणार नाहीत.

शिक्षण अधिकारी